महाराष्ट्र शासन

<u>महत्वाचे</u>

दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६

क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१५१-२०१६/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४३१, (विस्तार), ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दि. ०९ मे, २०१८

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य ,पुणे,
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,मुंबई,
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,मुंबई,
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,मुंबई,

विषय : वृक्ष लागवड, संगोपन व देखभालबाबत..
संदर्भ : शासनाचे समक्रमाकाचे दि.३१/१/२०१८,दि.१६ मार्च, २०१८ ची पत्रे.

उपरोक्त विषयासंदर्भात संदर्भाधिन पत्रान्वये दि.२५/१/२०१८ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवतानुसार कार्यवाही करण्याबात कळविण्यात आले आहे.

या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीसंदर्भात आढावा घेण्यासाठी सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली पुढील आठवड्यात होणा-या नियोजित बैठकीसाठी खालील मुद्यांसंदर्भात आपली माहिती दोन दिवसात सादर करावी. बैठकीची वेळ व दिनांक मागाहून कळविण्यात येईल.

अ) १) विद्यापीठे / महाविद्यालये स्तरावर जागेची उपलब्धता.
   २) रोप लागवडीसाठी खड्डे तयार करणे.
   ३) तयार खड्ड्यांची माहिती वन विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.
   ४) वृक्ष लागवडीसाठी रोपांची माहिती वन विभागाकडे नोंदविणे.

ब) हरितसेना सदस्यत्वासाठी विद्यापीठे /महाविद्यालये यातील शिक्षक /शिक्षकेतर / विद्यार्थी इ.यांची केलेली नोंदणी.

क) वृक्ष लागवडीचा प्रचार / प्रसार करण्यासाठी वृक्ष दिंडी, प्रचार फेरी असे राबविलेले जनजागृती कार्यक्रम.

ड) क्षेत्रीय स्तरावर होणा-या बैठकीच्या अजेंड्यावर वृक्ष लागवडीबाबत विषयाचा समावेश.

इ) N.S.S./N.C.C. विद्यार्थ्यांची उपलब्धता.

ई) मा.राज्यपाल महोदय यांनी दिलेल्या सूचनेनुसार एक झाड /एक विद्यार्थी हा उपक्रम राबविणे.

आपला,

(शा. भा. पारनाईक)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/शैवि/वृक्षलागवड/2018/ 1785
दिनांक :- 10 MAY 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय
सर्व शासकीय तंत्रनिकेतन, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था , नागपूर विभाग,
नागपूर .

शासन पत्राच्या अनुषंगाने सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे आपण आपल्या स्तरावर मुद्दयांसुद कार्यवाही करावे. तसेच या कार्यालयांचे पत्र क्र.तंशिस/विकाना/वृक्षलागवड/2018/1529 दि.16/04/2018 चे अवलोकन करून दिलेल्या प्रपत्रात न चुकता अचुक माहिती <u>दि. 11/05/2018 दु. 2.00 वाजेपर्यंत</u> या कार्यालयाच्या ईमेल व्दारे तात्काळ पाठविण्यांत यावे. जेणे करुन सदर माहिती मा. संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना सादर करणे शक्य होईल.

(गुलाबराव ठाकरे)
**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

E/Mrs. SAPNA KOWE/OFFICE LETTER/endorsement letter